## प्रारुप

**श्री. रेणुका शुगर्स लिमिटेड यांच्या प्रस्तावित साखर कारखाना विस्तार १२५० टी.सी.डी ते ५००० टी.सी.डी, सहवीज निर्मिती १५ मेगावॅट आणि ६० किलो. ली. प्रतिदिन आसवानी/ इथेनॉल प्रकल्प देवनांद्रा, ता. पाथरी, जिल्हा. परभणी, महाराष्ट्र या प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्तांत.**

श्री. रेणुका शुगर्स लिमिटेड यांच्या प्रस्तावित साखर कारखाना विस्तार १२५० टी.सी.डी ते ५००० टी.सी.डी, सहवीज निर्मिती १५ मेगावॅट आणि ६० किलो. ली. प्रतिदिन आसवानी/ इथेनॉल प्रकल्प देवनांद्रा, ता. पाथरी, जिल्हा. परभणी, महाराष्ट्र येथे सायंकाळी ४.०० वाजता कारखाना स्थळावर आयोजित करण्यात आली होती,

जनसुनावणीस खालील समिती सदस्य उपस्थित होते.

**१. श्री. अंकुश पिनाटे- अध्यक्ष**
अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, परभणी

**२. श्री. अनिल मोहेकर- सदस्य**
प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, परभणी

**३. श्री. जयंत कदम- संयोजक**
उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, परभणी

समिती संयोजक, श्री. जयंत कदम, यांनी सुरूवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत केले व मा. अध्यक्षांच्या संमतीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली. समन्वयक यांनी सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण वने आणि जलवायु परिवर्तन मंत्रालय नवी दिल्ली यांच्या १४ सप्टेंबर २००६ व सुधारीत अधिसुचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे व त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यांनी पुढे असेही सांगितले की श्री रेणुका शुगर्स लिमिटेड यांच्या प्रस्तावित साखर कारखाना विस्तार १२५० टी.सी.डी ते ५००० टी.सी.डी, सहवीज निर्मिती १५ मेगावॅट आणि ६० किलो ली प्रतिदिन आसवानी/ इथेनॉल प्रकल्प देवनांद्रा, ता. पाथरी, जिल्हा. परभणी, या प्रकल्पाची पर्यावरण विषयक जनसुनावणीसाठीचा प्रस्ताव प्राप्त झाला होता. त्याअनुसरून पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यात येत आहे. सदर प्रस्तावित साखर विस्तारीकरण प्रकल्प व आसवणी प्रकल्प हे अधिसूचनेच्या ५(ज) व ५(ग) या प्रवर्गात मोडतात.

पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामन्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणाऱ्या प्रदुषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सुचनेचा विचार करणे आहे. अधिसुचनेनुसार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून एक महिना अगोदर स्थानिक वृत्तपत्रात दि. २९/०९/२०१९ रोजी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीची सूचना स्थानिक मराठी वृत्तपत्र

सकाळ आणि इंग्रजी वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. नागरीकांना उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती सुचना असल्यास त्या लेखीस्वरूपात नोदंविण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण आघात मुल्यांकन अभ्यास अहवालाची प्रत खालील ठिकाणी उपलब्ध करण्यात आले होती.

शासनाच्या विविध कार्यालयांमध्ये म्हणजेच जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, उप विभागीय कार्यालय, तहसीलदार, सरपंच/ग्रामसेवक, मुख्य कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद व उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, परभणी.

त्यानंतर समिती संयोजक यांनी प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रकल्पाचे तपशील आणि पर्यावरणीय व्यवस्थापन योजनेचे स्थानिक भाषेत स्पष्टीकरण देण्यास सांगितले. त्यांनी तांत्रिक सादरीकरणानंतर कोणत्याही प्रकल्पावर आपत्ती / सूचना देण्यासाठी जनतेस आवाहन केले.

पर्यावरण सल्लागार. श्री. श्रीकांत काकडे (मिटकॉन कन्सल्टन्सी अँड इंजिनिअरिंग सर्विसेस लिमिटेड) यांनी प्रकल्प आणि पर्यावरण व्यवस्थापन योजनेची तपशीलवार माहिती दिली. यामध्ये प्रस्तावित कारखान्याची तपशीलवार माहिती, प्रकल्पासाठी लागणारा कच्चा माल, इतर गरजा, स्थानिक पर्यावरण, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावर होणारे संभाव्य परिणाम व त्यावर करण्यात येणारी उपाययोजना याची सविस्तर माहिती दिली. यामध्ये त्यांनी नियोजित साखर प्रकल्पामध्ये साखर -५२० मे.टन/दिवस, बगॅस- १४०० मे.टन/दिवस, प्रसमड-२०० मे.टन/दिवस निर्माण होईल. साखर कारखाना हा गळीत हंगामात १६० दिवस, विद्युत निर्मीती प्रकल्प १६० ते १९० दिवस आसवणी प्रकल्प २७० दिवस चालविण्यात येईल. नियोजित आसवणी प्रकल्पासाठी २४० मे.टन/दिवस मोलायसेसची धान्य १६० मे.टन/दिवस व उसाचा रस १००० मे.टन/दिवस नियोजित साखर प्रकल्पासाठी ३०० घन.मी/दिवस, आसवणी प्रकल्पासाठी ४७५ मे.टन/दिवस व ग्रन बेस्ड आसवणी प्रकल्पसाठी ६६१ घन.मी./दिवस पाण्याची आवश्यकता आहे. पाण्याचे स्रोत हे गोदावरी नदी आहे. उद्योगाकडे ७०.९६ हेक्टर क्षेत्र असून त्यामध्ये ३.८ हेक्टरवर साखर उद्योग, ८ हेक्टरवर आसवणी प्रकल्प व ३.५ हेक्टर क्षेत्रावर विद्युत निर्मीती प्रकल्पासाठी जागेची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत साखर उद्योगासाठी ४० टन/तास क्षमतेचे बॉयल असून १०० मे.टन/तास क्षमतेचे बॉयलर, १५ मेघा वॅट क्षेमतेचे जनित्र नियोजित आहे. सद्यस्थितीत ५०० के.व्हि.ए. क्षमतेचे डी.जी.सेट असून १००० के.व्हि.ए. क्षमतेचा डी.जी.सेट प्रस्तावित आहे. नियोजित प्रकल्पसाठी बगॅस ११५० मे.टन/दिवस, कोळसा ७४५ मे.टन/तास व बायोगॅस ९७९ घन.मी./तास आवश्यक आहे. नियोजित साखर उद्योगासाठी ८२.मे.टन/तास, आसवणी प्रकल्पासाठी १५ मे.टन/तास व बॉयलर डिऐरीऐटर साठी ३.मे.टन/तास वाफेची आवश्यकता आहे.

तसेच त्यांनी असे विषद केले की, नियोजित साखर प्रकल्पातून ४३० घन.मी. सांडपाणी निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर सांउपाणी प्रक्रिया यंत्रणेमध्ये प्रक्रिया करुन प्रक्रियाकृत पाण्याचा पर्नवापर करण्यात येईल. मोलॅसेसवर आधारीता आसवणी प्रकल्पातून प्रतिदिन११९० घन.मी. व धान्यावर आधारीत आसवणी प्रकल्पातून १०४० सांडपाणी निर्माण होईल. निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रकिया करणेकरीता बायोगॅस, मल्टीपल ईफेक्ट इव्हॅपरेटर व खत निर्मीती प्रकल्प प्रस्तावित आहे. धान्यावर आधारीत आसवणी प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या टाकाऊ मधून डीडीजीएस उत्पादीत होईल व ते जनावरांचे खाद्यासाठी विक्री करण्यात येईल. सद्यस्थितीत प्रतिदीन ४.२ मे.टन राख निर्माण होते व प्रस्तावित प्रकल्पातून प्रतिदिन १५.७

मे.टन राख निर्माण होईल. सदर राख खत प्रकल्पामध्ये वापरण्यात येईल. हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणेसाठी १०० मे.टन/तास क्षमतेचा बॉयलरसाठी इलेक्ट्रोस्टॅटीक प्रसीपीटेटर (ESP) ६५ मी. उंचीच्या प्रस्तावित आहे. सद्यस्थितीत कुशल कामगार ८० व अकुशल कामगार ४०० असून प्रस्तावित प्रकल्पाकरीता १०० व अकुशल कामगार १५० ची आवश्यकता आहे. नियोजित गुंतवणू रु. २२७.७१ कोटी असून पर्यावरण व्यवस्थापनासाठी रु. २४.४६ कोटीची तरतदु आहे.

तदनंतर त्यांनी असे सांगितले की, नियोजित प्रकल्पाच्या १० कि.मी. त्रिजेच्या क्षेत्रामध्ये पर्यावरण विषयक हवा, पाणी, माती, ध्वनी जैविक पर्यावरण सामाजिक व आर्थिक पर्यावरण व जमीन वापरासंबंधी अभ्यास करण्यात आला. नियोजित प्रकल्पातून देवनांद्रा हे गाव १ कि.मी. पूर्वेस असून पाथ्री शहर हे ०.७ कि.मी. अंतरावर आहे. अंबड —मानवत राज्यरस्ता व मानवत रेल्वे स्थानक नियोजित प्रकल्पापासून जवळ आहे. तसेच नांदेड येथील निमानतळ अंदाजे ९५ कि.मी. अंतरावर आहे. सदर १० कि.मी. त्रिजेच्या अभ्यास क्षेत्रातमध्ये आरक्षीत वने व संवेदनशिल क्षेत्र येत नाही. गोदावरी नदी ही ८.२ कि.मी. अंतरावर आहे. या भागामध्ये वार्षिक पर्जन्यमान ९६२.८ मी.मी., कमाल तापमान ४४.३° C व किमान तापमान ९.६°C असून आद्रता २४.८३ % आहे.

अभ्यास क्षेत्रामध्ये कृषिक्षेत्र ९४.८%, मानवी वसाहत ३.०६%, पाण्याचे क्षेत्र ०.६८% व स्क्रब जागा १.४६ % आहे.

त्यांनी असे सांगितले की, अभ्यास क्षेत्रामध्ये हवेच्या गुणवत्तेचे मोजमापन केरण्यात आले ज्यामध्ये (**PM१०**) ३५.४-५५.८ mg/m3, (**PM२.५**) १५.२-२२.२ mg/m3, सल्फर डायऑक्साईड (So2) ८.०-१४.५ mg/m3, नायट्रोजन ऑक्साईड (NOx) ८.०-२०.७ mg/m3, असून विहित मर्यादेत आहेत. पाणी तपासणी करीता ११ ठिकाणामध्ये भुपृष्टावरील पाणी — ३ ठिकाणी व भुगर्भातील पाण्याचे - ८ ठिकाणी नमुना संकलन करण्यात आले. यामध्ये ईकोलाई व्यतीरीक्त सर्व घटक विहीत मर्यादेत असल्याचे निदर्शनास आले. ८ ठिकाणी करण्यात आलेल्या माती परीक्षण अहवालावरुन माती काळी व तपकीरी असुन शेतीसाठी उपयुक्त असल्याचे निदर्शनास आले. ध्वनीचे मोजमाप ९ ठिकाणी करण्यात आले. यामध्ये दिवसा ४४.३-४७.५ dB(A) व रात्रीचे वेळी — ३२.२-४७.५ dB(A) अशी ध्वनीची पातळी विहीत मर्यादेत असल्याचे निदर्शनास आले.

त्यांनी असे विषद केले की प्रस्तावित प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर सदर परिसरातील हवा, जल, जैविक, ध्वनी व समाजीक पर्यावरणावर परिणाम होऊ नये या करीता आवश्यक ती पुरुशी काळजी घेण्यात येईल. यामध्ये हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणेकरीता बसविण्यसत येणाऱ्या इएसपीची क्षमता ९९.९ % असेल. डी.जी. सेट हे विद्युत पुरवठा खंडित झल्यावरच वापरण्यात येतील. सांडपाणी प्रक्रिया व्यवस्थापनामध्ये नियोजित आसवणी प्रकल्प हा शुण्य विसर्ग तंत्रज्ञानावर आधारित असेल. तसेच साखर उद्योगातून निर्माण होणारे पाणी प्रक्रिया करुन बागकाम व शेतीसाठी वापरण्यात येईल. हरीत पट्टा हा २३.५ ऐकर क्षेत्रात विकसीत करण्यात येईल व रु. ३.४१ कोटी हे सामाजीक कार्यक्रमासाठी आरक्षित करण्यात येईल. तसेच सदर परिसरातील गावांमध्ये LED/सोलार लाईट, लाभक्षेत्र विकास, पाणी प्रक्रिया यंत्रणा, वृक्ष लागवड, इ. साठी रु. ३.४० कोटीची तरतुद करण्यात येईल. तसेच उद्योगाने रु. २४.१५ कोटी ची तरतुद पर्यावरण

व्यवस्थापन गुंतवणूकीसाठी केलेली असून रु. ६.२१ कोटीची तरतुद पर्यावरण व्यवस्थापन यंत्रणा कार्यान्वित करणेसाठी केलेली आहे.

सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर समितीने अध्यक्षांनी लेखी किंवा तोंडी असल्यास हरकत / सूचना असल्यास त्या देण्यासाठी आवाहन केले. यानंतर खालील प्रमाणे प्रश्नउत्तरे झाली.

**१. अंगद तुळशीराम खेडेकर (गोपेगाव)**

बॉयलर मधून बाहेर पडणाऱ्या राखेचे व्यवस्थापन कसे केले जाईल?

**उत्तर:** प्रकल्पातून बाहेर पडणाऱ्या राखेला नियंत्रित करण्यासाठी इलेकट्रोस्टॅटीक प्रेसिपिटेटर बसविण्यात येईल ज्याची कार्यक्षमता ९९.९९% इतकी असेल. तसेच चिमणीची उंची ६५ मी. ठेवण्यात येईल.

समितीचे अध्यक्ष श्री. अंकुश पिनाटे यांनी प्रस्तुत प्रश्न सध्याच्या कारखान्यावर आहे की प्रस्तावित प्रकल्पावर आहे? असे विचारले यावर हा प्रश्न सध्याचा कारखाण्यासंबंधित आहे असे सांगण्यात आले. त्यावर प्रकल्पाच्या सल्लागार डॉ. हेमांगी नलावडे यांनी सांगितले कि, सध्या अस्तित्वात असलेल्या कारखान्यामध्ये हवा प्रदूषणासाठी वेट स्क्रबर बसवलेला आहे. यावर श्री. पिनाटे यांनी असे सांगितले की म.प्र.नि.मंडळामार्फत या प्रकरणी तपासणी करुन त्रुटी आढळल्यास कारखान्याने त्रुटींची पुर्तता करावी.

**२. सिद्धेश दातारे (बाणेगाव)**

कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या स्पेंटवॉशवर कश्या प्रकारे प्रक्रिया केली जाईल?

उत्तर: कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या स्पेंटवॉश चे बाष्पीभवनाच्या म्हणजेच मल्टि इफेक्ट इव्हॅपोरेटरच्या माध्यमातून रिडक्शन केले जाईल व त्यानंतर बायोमेथायनेशन म्हणजेच बायोगॅस व बायोकंपोस्टिंग द्वारे स्पेंटवॉश वर प्रक्रिया केली जाईल.

**३. नितीन शिंदे (देवनांद्रा)**

नवीन प्रकल्पासाठी कारखाना व्यवस्थापनाचे शेतकऱ्याच्या वतीने अभिनंदन केले. कारखान्याची सुनावणी हि प्रस्तावित कारखान्यासाठी जरी असली तरी देखील जुन्या कारखान्याच्या भोवती ज्या नवीन वसाहती झाल्या आहेत त्या सर्व लोकांना कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या काजळीचा त्रास होतो आहे. आमचे निरीक्षण असे आहे कि, आजही या भागात सर्व घरात ह्या काजळी मुळे त्रास होतो आहे. हि काजळी श्वसनातून फुफुसात जात आहे. यावर कारखानाने कोणतीही कारवाही केलेली दिसत नाही. यावर नुसतीच आश्वासने दिली जातात, परंतु त्यावर कारवाही होत नाही. कारखान्याच्या चिमणीची उंची वाढवणार होते ती देखील वाढवली नाही. प्रकल्प सुरु होतो व नंतर तुम्ही कुंन्हास जुमानत नाही.

माझी प्रदूषण मंडळास विनंती आहे कि आपण अशा गोष्टीवर नियंत्रण ठेवावे. कारखान्यामुळे आजू बाजूच्या वसाहती मध्ये पाणी प्रदूषण होत होत आहे. प्रस्तुत प्रकल्पामध्ये पर्यावरणासंबंधीचे नॉर्म्स दिले आहेत त्याची कारखान्याने पूर्तता करावी. व त्यासाठी ठेवलेल्या निधीचा वापर पर्यावरण संरक्षणासाठी ठेवलेल्या निधीचा वापर त्यासाठीच करावा.

उत्तर: प्रकल्पाचे प्रवर्तक श्री. वेरूळकर यांनी सांगितले कि, कारखान्यातून राख बाहेर पडण्यास कारण कारखान्यात असलेली ४० वर्ष जुनी मशीनरी व टेकनॉलॉजी आहेत. कारखान्याच्या विस्तारामध्ये सर्व नवीन मशीनरी व ऍडव्हान्स टेकनॉलॉजि वापरणार आहोत. जेणे करून सर्व गोष्टी नियंत्रणात आणता येतील. यासाठी कारखाना सर्व प्रयत्न करणार आहे. आपण म्हंटल्याप्रमाणे आम्ही यापूर्वीही कारखान्यामध्ये

नवीन मशीनरी बसवण्याचा प्रयत्न केला परंतु काही तांत्रिक कारणामुळे तो अपयशी झाला. पाणी प्रदूषणाच्या बाबतीत आम्ही कमीत कमी पाणी ई. टी. पी. कडे जाईल व ई.टी. पी. मध्ये जाणाऱ्या पाण्यावर योग्य प्रक्रिया होईल व पाणी पुन्हा वापरले जाईल. आम्ही कारखान्यामध्ये हरित पट्ट्याचा विकास करीत आहोत, मागच्याच वर्षी आम्ही आंब्याची ६०० झाडे लावली. तसेच इतर वड, पिंपळ, कडुलिंब ई. विविध प्रकारची ४०० झाडे लावली. तसेच प्रस्तावित प्रकल्पाच्या आवशक्यतेनुसार आम्ही त्यात अधिकाधिक वाढ करणार आहोत व हरित पट्ट्यासाठी राखून ठेवलेला निधी या कामासाठी वापरला जाईल.

**४. श्री. मोहेकर - जनसुनावणी सदस्य (प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ)**

आसवणी प्रकल्पातील सांडपाणी व खत प्रकल्पामुळे निर्माण होणाऱ्या दुर्गंधीमुळे आजूबाजूच्या वस्तीला त्रास होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आसवनी प्रकल्पास परवागी देणे योग्य नाही.

उत्तर: पर्यावरण सल्लागार डॉ.हेमांगी नलावडे यांनी सांगितले कि कारखान्यातून निर्माण होणाऱ्या दुर्गंधी साठी योग्य व्यवस्थापन केले जाईल. बायोकंपोस्टिंग साठीचे ठिकाण मानव वस्ती पासून अंदाजे ६ ते ७ कि.मी. अंतरावरील कारखान्याच्या मालकीच्या जागेवर करण्यात येईल. तसेच दुर्गंधी निर्माण करणाऱ्या प्रक्रिया म्हणजे अधिक काळ स्पेंटवॉशची साठवण, यीस्टचे डिकंपोसिशन टाळले जाईल. तसेच कारखान्याभोवती ६ मी रुंदीचा हरितपट्टा निर्माण केला जाईल व कारखाना व्यवस्थापन याची संपूर्ण काळजी घेईल.

प्रकल्प प्रवक्ते वेरूळकर यांनी सांगितले कि कारखान्याच्या आजूबाजूच्या लोकवस्तीस आसवणी प्रकल्पामुळे दुर्गंधीचा त्रास होणार नाही या बाबत दक्षता घेण्यात येईल आम्ही देखील या परिसरातच राहतो त्यामुळे दुर्गंधी कमीत कमी करण्यासाठी कारखाना निश्चितच प्रयत्न करेल.

यावर श्री. ज.अ.कदम, समिती समन्वयक तथा उप-प्रादेशिक आधिकारी यांनी असे सूचविले की बायोकंपोस्टींग ऐवजी अत्याधूनिक तंत्रज्ञान जसे की भस्मीकरण यंत्रणा वापरण्या बाबत का प्रस्तावित करण्यात आले नाही. यावर कारखाना प्रतिनिधी यांनी असे सांगितले की आवश्यक असेल त्यावेळेस आधूनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे बाबत योग्य तो विचार करण्यात येईल.

**५. दत्ता आत्माराम माने (गोपेगाव)**

कारखान्या भोवती असलेल्या छिनाऱ्या (मोठे गवत) काढून मोठी झाडे लावणार आहेत का?

उत्तर: श्री वेरूळकर यांनी याबद्दल माहिती दिली कि, मोठी झाडे लावायचे काम सुरु झालेले आहे. तसेच हे गवत काढून अजून मोठी झाडे लावली जाणार आहेत.

**६. शिवाजी इंगळे (बोरगाव)**

उसाच्या मिळणाऱ्या दराबद्दल कोणाकडे विचारणा करायची? तसेच बाकी कारखाने जास्त भाव देतात व हा कारखाना कमी भाव देतो.

उत्तर: श्री. वेरूळकर यांनी स्पष्टीकरण केले कि यासाठी केन डेव्हलपर अधिकारी व केन अधिकारी यांची नेमणूक केली आहे. हे लोक तुमच्या सर्व समस्यांचे निराकरण करतील. तसेच सरकारने कारखान्याची एफ.आर.पी. ठरवलेली असते. त्याप्रमाणे आम्ही एफ.आर.पी. प्रमाणे दर दिलेला आहे.

## ७. तेजस शेळके (देवनांद्रा)

कारखान्यासाठी लागणाऱ्या पाण्याचे व्यवस्थापन कसे केले जाईल?

उत्तर: कारखान्यातून निर्माण होणाऱ्या प्रदूषित पाण्यावर ट्रीटमेंट करून ते पाणी पुनर्वापरासाठी घेतले जाईल व उरलेले पाणी आपण गोदावरी नदीतून घेणार आहोत.

## ८. दादासाहेब टेंगसे (जिल्हा परिषद-सदस्य, देवनांद्रा, देवनांद्रा)

आजची मीटिंग पर्यावरणासंबंधित असली तरी, माननीय कलेक्टर साहेब येणार आहेत, तसेच उसाच्या दराबद्दल चर्चा होईल, असे शेतकऱ्यांना वाटले. रेणुका शुगर कारखान्याचा विस्तार करणार आहे त्यासाठी त्याचें मी सर्व शेतकऱ्यांच्या वतीने अभिनंदन करतो, परंतु त्याच बरोबर एक जबाबदार नागरिक म्हणून, आपण आजूबाजूचे शहर व घरे यांचा विचार केला पाहिजे. कारखाना आता १२५० टी.सी.डी. वरून ५००० टी.सी.डी ला जाणार आहे. यावर्षी ऊस देखील चांगला आहे. जायकवाडी धरण देखील पूर्ण क्षमतेने भरलेले आहे. त्यामुळे या भागात भरपूर ऊस पुढच्यावर्षी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे कारखान्याचा विस्तार करणे तेवढेच गरजेचे आहे. हा कारखाना सहकारी तत्वावर चाललेला आहे परंतु तो नंतर तो खाजगी मध्ये गेल्याने त्यावर बरीच बंधने आली. मागच्यावर्षी उसाचे प्रमाण बरेच होते, परंतु, कर्नाटकामधले कारखाने लवकर बंद झाले व त्यामुळे तिकडचा ऊस बाहेरच्या कारखान्यामध्ये गेला, त्यामुळे हि परिस्थिती झाली. यापरिसरात ऊस भरपूर असल्याने, कारखाना विस्ताराची आवश्यकता या भागात आहे. कारखाना विस्तारामुळे खत निर्मिती होणार आहे तसेच वीज निर्मिती होणार आहे परंतु हे सर्व करत असताना कारखान्याने निर्माण होणाऱ्या प्रदूषणाचादेखील, गांभीर्याने केला पाहिजे. परिसरात पसरणाऱ्या काजळी वर उपाय योजना केली जावी तसेच प्रदूषित पाण्यामुळे होणाऱ्या, समस्यांवर देखील लवकरात लवकर उपाय योजना करणे आवश्यक आहे. कारखाना सुरु व्हावा हि सर्वांचीच मनोमन इच्छा आहे, तसेच जुना कारखाना सील झाल्यानंतर, कामगारांचे पगार थकलेले आहेत. कारखाना सील झाल्यावर पैसे कलेक्टर ऑफिस ला जमा होतात. त्यावर कलेक्टर ऑफिस ने कामगारांचा थकलेल्या पगारावर विचार करावा. तसेच यावर काही मार्ग निघतो का ते पाहावे अशी माझी विनंती आहे.

## ९. नाथा आंबट (पाथरी)

सध्याच्या कारखान्यात कामगारांना काहीही सुविधा कारखाना पुरवत नाही. संडास, रस्ते, पाणी वीज इ. सुविधा पुरेश्या प्रमाणात उपलब्ध नाहीत. शाळेच्या मुलांना जायला रस्ते देखील नाहीत. या बाबत व्यवथापनाकडे विचारणा केली असता लवकरात लवकर करू असे सांगण्यात येते. त्यामुळे यासर्वांकडे प्रशासनाने लक्ष्य द्यावे अशी माझी विनंती आहे.

उत्तर: कारखान्याचे प्रवर्तक श्री वेरुकर म्हणाले कि, सर्व सुविधा पुरवण्यासाठी कारखाना प्रयत्न करीत आहे. मागील काही महिन्यांपासून सतत पाऊस पडत असल्यामुळे, काम करण्यात अडथळा येत आहे. परंतु आम्ही हे लवकरात लवकर करून घेऊ.

श्री. अंकूश पिनाटे, समिती अध्यक्ष यांनी असे सांगितले की, उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाबद्दल चांगले विचार मांडलेले असून यामध्ये अस्तीत्वात असलेल्या उद्योगाच्या तक्रारी बाबत म.प्र.नि.मंडळाने शहानिशा करुन निदर्शनास आलेल्य त्रुटीच्या अनुषंगाने उद्योगाने त्रुटींची पुर्तता करावी तसेच प्रस्तावित विस्तारीकरणा बाबत उपस्थितांनी चांगला प्रतिसाद दिलेला असून सभोवतालच्या परिसरातील नागरीकांच्याआरोग्याबाबत कारखान्याने काळजी घ्यावी.

प्रश्नोत्तर संपल्यावर अध्यक्षांनी बैठकीची समाप्ती केली व पुढे त्यांनी सांगितले की, सर्व आक्षेप आणि सार्वजनिक सुनावणीचे तपशील पर्यावरण वने आणि जल वायू परिवर्तन मंत्रालयल, भारत सरकार, यांना पाठविले जाईल.

शेवटी श्री. कदम संयोजक आणि उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी माननीय अध्यक्षांच्या संमतीने सार्वजनिक सुनावणी पूर्ण झाल्याचे जाहीर केले.

**१. श्री. अंकुश पिनाटे- अध्यक्ष**
अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, परभणी

**२. श्री. अनिल मोहेकर- सदस्य**
प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद

**३. श्री. जयंत कदम- संयोजक**
उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, परभणी

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

# पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीची सूचना

मे. रेणुका शुगर्स लि, ता.पाथरी, जि. परभणी यांच्या प्रस्तावित विस्तारीकरण या नियोजीत प्रकल्पाचा पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालयाकडे पर्यावरण विषयक लोक सुनावणीसाठी प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावित साखर कारखाना विस्तार १२४० टन/दिन ते ५००० टन/दिन, सहवीज निर्मिती १५ मेगावॅट आणि ६० किलो लि प्रतिदिन आसवनी/इथेनॉल प्रकल्प उत्पादन क्षमता एवढी राहील. भारत सरकार, पर्यावरण व वन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसूचना क्र. एस.ओ. १५३३ दि. १४/०९/२००६ नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका-टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोक सुनावणीचे आयोजन केले आहे.

सदर प्रकल्पाच्या परिसरामध्ये रहिवासी, पर्यावरण विषयी काम करणाऱ्या संस्था, प्रकल्पामुळे विस्थापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी यांना सुचना, टिका-टिप्पणी किंवा आक्षेप तोंडी तसेच लेखी स्वरुपात नोंदविता येतील. लेखी स्वरुपात सुचना ही जाहीरात प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसापर्यंत खालील पत्त्यावर पाठविण्यात याव्यात :-

**उप-प्रादेशिक कार्यालय, परभणी**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,**
**पहिला मजला, रंगनाथमहाराज नगर, नांदखेडा रोड, परभणी.**

तसेच तोंडी अथवा लेखी स्वरुपातील सूचना खालील ठिकाणी जाहीर लोकसुनावणी वेळेत केल्या जाऊ शकतात. लोक सुनावणीचे ठिकाण :-

**श्री रेणुका शुगर्स लि.**
**कारखाना साईट, देवनांद्रा, ता. पाथरी, जि. परभणी.**

लोक सुनावणीची तारीख :- **दि. ०१/११/२०१९, शुक्रवार**
लोक सुनावणीची वेळ :- **दुपारी ४.०० वाजता.**

सदर प्रकल्पासंबंधी माहिती असलेले दस्ताऐवज खालील कार्यालयामध्ये मराठी व इंग्रजी भाषेमध्ये उपलब्ध करण्यात आलेले असुन कार्यालयीन वेळेमध्ये संबंधीत व्यक्ती या सदर कागदपत्रे अभ्यासू शकतील.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी. २. जिल्हा उद्योग केंद्र, परभणी.
३. जिल्हा परिषद कार्यालय, परभणी. ४. पंचायत समिती, ता.पाथरी, जि. परभणी.
५. ग्रामपंचायत कार्यालय, देवनांद्रा, बोरगांव, पोहेटाकळी, ता. पाथरी, जि. परभणी.
६. उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय, ता. पाथरी, जि. परभणी.
७. तहसिलदार यांचे कार्यालय, तहसिल कार्यालय, ता. पाथरी, जि. परभणी.
८. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पर्यावरण भवन, प्लॉट क्र. ओ-४/१, एसआयडीसी चिकलठाणा, औरंगाबाद. ९. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईंट, ३ रा मजला, सायन (पुर्व), मुंबई-४०००२२. १०. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, १५ मजला, मादाम कामा रोड, मुंबई. ११. पर्यावरण मंत्रालय, वन आणि हवामान बदल, तळ मजला, इस्ट विंग, नविन सचिवाल इमारत, सिव्हील लाइन्स, नागपूर ४४००१.

स्वाक्षरित/-
(ज.अ.कदम),
उप-प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
परभणी.

दै. सकाळ. दि. 29/09/2019.

Daily Times of India                                        dtd. 29.09.2019

# NOTICE FOR ENVIRONMENTAL PUBLIC HEARING

M/s. Renuka Sugars ltd, At Devnandra Tq. Pathri Dist. Parbhani has proposed sugar plant expansion from 1250 TCD to 5000 TCD, Co-generation power plant 15 MW and 60 KLPD Distillery / Ethanol Plant. As per the Notification dated 14 Sept. 2006 issued by the Ministry of Environment & Forests, Govt. of India, New Delhi & amendments 1st December 2009 public hearing is proposed to be conducted from envirnmental angle about the said project. All the persons including bonafide residents, environment groups and other located at the project site can participate in the Public Hearing.

Suggestion, views, comments, objection of the public can filed at the following address in writing within 30 days from the date of publication of this notice.

Sub-Regional Officer,
Deokrupa Building,1st Floor, Rangnath Maharaj Nagar,
Nandakhed Road, Parbhani.

oral and written suggestion can also be presented during the public hearing to be conducted :

| | | |
|---|---|---|
| Venue | : | M/s. Renuka Sugars Ltd, At. Devnandra, Tq. Pathri, Dist. Parbhani. |
| Date of Public Hearing | : | 01/11/2019 |
| Time of Public Hearing | : | 04.00 PM |

Copies of the executive summary containing the salient feature of the Project, both English and Marathi and other information / documents are available in the following offices.

1. District Collector, Collector Office, Parbhani.
2. Chief Executive Officer, Zilla Parishad, Parbhani.
3. District Industries Centre, Parbhani.
4. The Regional Officer, M.P.C. Board, Paryavaran Bhavan, Behind Dhoot Hospital Chikhalthana MIDC Area, Jalna Road, Aurangabad.
5. Head Office, M.P.C. Board, Kalpataru Point, 3rd & 4th Floor, Sion Matunga Scheme Road, No. 8, Opp. Sion Circle, Sion [East] Mumbai 400032.
6. Environment Department, Govt. of Maharashtra, New Administrative Building, 15th Floor, Madam Kama Road, Mantralaya, Mumbai.
7. The Sub-Regional Office, M.P.C. Board, Dev Krupa Building, Rangnath Maharaj Nagar, Nandakheda Road, Parbhani.
8. Sub-Divisional Officer, Pathri, Tq. Pathri, Dist. Parbhani
9. Tahsil Office, Pathri, Tq. Pathri, Dist. Parbhani.
10. Gram Panchyat, Devnandra, Borgaon, Pohetakli.

All the concerned person will be provided access to the executive summary of the project during office hours at the above mentioned places.

Sd/-
(J. A. Kadam)
Sub-Regional Officer,
M.P.C. Board, Parbhani.

Scanned by CamScanner